# आरती श्री मारूतीची

जय जय जय श्री भगवंत कपिवर श्री हनुमंता
होई तन मन निश्चिंत तुज आरती ओवाळिता ॥धृ.॥

समजूनी फळ आकाशी उडी घेई जन्मता
करी भूभू:कार गिळूनी सूर्य उगवता
माजे हाहाःकार त्रिभुवनी अंधार होता
निगळूनी आदित्या पुनरपि सुखवी जगता
जय जय जय श्री भगवंत कपिवर श्री हनुमंता
होई तन मन निश्चिंत तुज आरती ओवाळिता ॥१॥

क्षणी होई दास भेट होता दाशरथीचा
शोधूनी सीतामाई दावी श्रीराममुद्रिका
जाळूनी लंका शिकवी धडा मग तू दशमुखा
उचलूनी गिरी आणी देण्या संजीवन सौमित्रा
जय जय जय श्री भगवंत कपिवर श्री हनुमंता
होई तन मन निश्चिंत तुज आरती ओवाळिता ॥१॥

- नारायण
१२/२७/९६